महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# जनावरांचे जंतनाशन





जनावरांमध्ये गोलकृमी, पट्टकृमी व पर्णकृमी असे तीन प्रकारचे जंत आढळतात. जंत जनावरांच्या शरीरातील अन्नद्रव्य शोषून घेतात आणि त्यामुळे जनावरांच्या शरीरावर विपरीत परिणाम होतो. त्यासाठी जंतनाशन करणे अत्यंत आवश्यक असते.

## जंतावरील दुष्परिणाम

### जंतांमुळे होणारे दुष्परिणाम

- दूध उत्पादनात घट होते
- प्रजनन क्षमता घटते
- शरीराची वाढ खुंटते
- शरीर खंगत जाते
- रक्तक्षय होतो
- अपचन होते
- शेळ्या-मेंढ्या/वासरांमध्ये मृत्यु संभवतो
- रोग प्रतिकारशक्ती कमी होते
- बैलांच्या कार्यक्षमतेत लक्षणीय घट होते
- अशक्तपणा येतो
- लोकर व मांस उत्पादन घटते
- इत्यादी

## जंतनाशनाचे काय फायदे आहेत ?

- वासरांचे वजन झपाट्याने वाढते.
- शेळ्या-मेंढ्या /वासरातील मरतुक घटते.
- लोकर, मांस उत्पादन व प्रत सुधारते.
- दूध उत्पादनात वाढ होते.
- प्रजननक्षमतेत वृद्धी होते.
- बैलाची कार्यक्षमता वाढते.

## जंतनाशन केव्हा करावे ?

- वासरू जन्मल्यानंतर पहिली मात्रा तिसऱ्या ते दहाव्या दिवशी व नंतर दर महिन्यांनी सहा महिन्यापर्यंत
- शेळ्या-मेंढ्याच्या पिलात/ कोकरात प्रथम मात्रा दिड महिन्यास व त्यानंतर दर महिन्यांनी सहा महिन्यापर्यंत
- प्रौढ शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशीत वर्षातून किमान दोन वेळा (पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर)

**करा पशुंचे जंतनाशन ।**
**होईल आरोग्यरक्षण ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर